भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका
वैद्यकिय आरोग्य विभाग
बीजीपी दवाखाना

प्रस्तावना :-

विषय :- राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान अंतर्गत महानगरपालिकेचे बीजीपी दवाखाना (बाई गुलबाई पेटीट दवाखाना)/UCHC करीता आवश्यक वैद्यकिय साहित्य/उपकरणे/सामुग्री सन २०२४-२५ या वर्षात ई-निविदानुसार खरेदी करणेकामी दर मागविणेबाबत.

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील नागरी वस्त्यांची घनता विचारात घेऊन नागरीकांना वैद्यकिय पायाभुत सेवा/सुविधा/आरोग्य सेवा उपलब्ध करणेसाठी राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान अंतर्गत मंजुर बीजीपी दवाखाना (बाई गुलबाई पेटीट दवाखाना) येथे ५० खाटांचे अर्बन कम्युनिटी हेल्थ सेन्टर (UCHC) चे बांधकाम पुर्ण झालेले आहे.

उक्त विषयाचे अनुषंगाने सदरचे UCHC कार्यान्वित करणेसाठी मा. प्रशासक तथा आयुक्त महोदयांच्या अध्यक्षतेमध्ये दि. ०८/०८/२०२४ रोजी आढावा सभा आयोजित करण्यात आलेली होती व सदर सभेमध्ये बीजीपी दवाखाना (बाई गुलबाई पेटीट दवाखाना)/ अर्बन कम्युनिटी हेल्थ सेन्टर (UCHC) कार्यान्वित करण्याच्या प्रक्रियेत प्रलंबित कामांचा आढावा घेऊन सर्व संबंधीत अधिकाऱ्यांना विहीत मुदतीत प्रलंबित काम पुर्ण करण्याचे निर्देश मा. प्रशासक तथा आयुक्त सो., यांनी दिलेले आहेत.

त्याअनुषंगाने सन २०२४-२५ या वर्षात बीजीपी दवाखाना (बाई गुलबाई पेटीट दवाखाना)/UCHC करीता आवश्यक वैद्यकिय साहित्य/उपकरणे/सामुग्री खरेदीसाठी राज्यस्तरीय वर्तमानपत्रात जाहीर प्रसिध्दी देवून व महाराष्ट्र शासनाच्या www. Mahatender.gov.in या संकेत स्थळावर ई-निविदा मागवून आवश्यक असलेल्या ११८ बाबींकरीता दर निश्चित करणे आवश्यक आहे.

सबब सन २०२४-२५ या वित्तीय वर्षात "मनपा दवाखानाकरीता संरक्षक भिंत/फर्निचर/वैद्यकिय साहित्य इ. खरेदी" या लेखाशिर्षातंर्गत मनपा अर्थसंल्पामध्ये रू. ४०० लक्ष तरतुद मंजुर आहे. पैकी राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान अंतर्गत महानगरपालिकेचे बीजीपी दवाखाना (बाई गुलबाई पेटीट दवाखाना)/UCHC करीता आवश्यक असलेल्या ११८ बाबींचे वैद्यकिय साहित्य/उपकरणे/सामुग्री खरेदी करणेकामी अंदाजे रू. १,३४,०७,२०६/- खर्चास आर्थिक व प्रशासकिय खर्चास व सदरचे वैद्यकिय साहित्य/उपकरणे/सामुग्रीसाठी ई-निविदा प्रसिध्द करून दर मागविणेसाठी सादर

केलेल्या प्रस्तावास सध्या मा. मुख्य लेखापरिक्षक, मा. मुख्य लेखा व वित्त अधिकारी तसेच मा. अति. आयुक्त यांनी केलेल्या शिफारशी प्रमाणे मा. आयुक्त महोदय यांनी त्यास दि. २६/०९/२०२४ रोजी पुर्व मान्यता दिलेली आहे.

यास्तव सन २०२४-२५ या वित्तीय वर्षाचे तरतुदीपैकी सदरचे वैद्यकिय साहित्य/उपकरणे/सामुग्री खरेदी करणेकामी मंजुर अंदाजे तरतुदीला अधिन राहून पुढील कालावधीमध्ये सदरचे वैद्यकिय साहित्य/उपकरणे/सामुग्री खरेदीसाठी अंदाजे रकमेचे प्रस्तावास स्वतंत्रपणे मंजुरी घेणेत येईल. मात्र तुर्तास आरोग्य सेवेच्या/अत्यावश्यक सेवेच्या दृष्टीकोनातुन वैद्यकिय साहित्य/उपकरणे/सामुग्रीचे निविदानुसार दर मागविणेकामी प्रशासकिय मान्यता मिळणेकामी प्रस्ताव सादर करणेत येत आहे.

ठराव क्र. ६९४

दिनांक ०२/१२/२०२४

नागरीकांना वैद्यकिय पायाभुत सेवा/सुविधा/आरोग्य सेवा उपलब्ध करणेसाठी राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान अंतर्गत महानगरपालिकेचे बीजीपी दवाखाना (बाई गुलबाई पेटीट दवाखाना)/UCHC कार्यान्वित करणे करीत वैद्यकिय साहित्य/उपकरणे/सामुग्रीची आवश्यकता असल्याने त्याकामी वैद्यकिय साहित्य/उपकरणे/सामुग्री खरेदी करणेकामी ई-निविदा प्रसिध्द करून आवश्यक ११८ बाबीचे दर मागविणेकामीचे प्रस्तावास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदीच्या अनुषंगाने सद्यःस्थितीत मा. स्थायी समिती अस्तित्वात नसल्यामुळे मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी अजय वैद्य, प्रशासक तथा आयुक्त, भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, बीजीपी दवाखाना (बाई गुलबाई पेटीट दवाखाना)/UCHC कार्यान्वित करणे करीत आवश्यक असलेले वैद्यकिय साहित्य/उपकरणे/सामुग्री सन २०२४-२५ चे अर्थसंकल्पिय तरतुदीमधील मंजुर अंदाजे तरतुदीस अधिन राहून दर मागविणेकामी आवश्यक ११८ बाबींची निविदा प्रसिध्द करणेसाठी मंजुरी देत आहे.

सही/- (अजय वैद्य)
आयुक्त तथा प्रशासक
भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका

f:\ashok jadhav 20-6-2020\lm\bgp hospital activity for installation\bgp tender 2024-25\prastavana1.docx2